# सायबर गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई

दिनांक- २३/११/२०२२ **प्रेस नोट** प्रेस नोट क्र- ११

## सोशल मिडीयाच्या माध्यमातून ‘ऑनलाईन पार्टटाईम जॉब’ देण्याचे अमिष दाखवून, नामांकित कंपन्यांची नावे, ओळखचिन्हे वापरुन लाखो रूपये लुबाडणारी टोळी उत्तर प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई यांच्या अथक प्रयत्नाने जेरबंद.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | :- | उत्तर विभाग सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई. |
| २ | गु.र.क्र. व कलम | :- | गु.र.क्र. ३८/२०२२ कलम गु.र.क्र. ३८/२०२२ कलम १२०(ब), ४१९,४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ भा.दं.वि. सह कलम ६६(क), ६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा |
| ३ | गुन्हा घडला दिनांक व वेळ | :- | २८/०७/२०२२ रोजी |
| ४ | गुन्हा दाखल दिनांक वेळ. | :- | ३०/०८/२०२२ रोजी |
| ५ | गुन्हयाचे ठिकाण. | :- | फिर्यादी यांचे रहाते घरी वापरता मोबाईल. |
| ६ | फसवणूक रक्कम | :- | रू. ३४,१४,३६२/- (अक्षरी चौत्तीस लाख चौदा हजार तीनशे बासष्ठ रूपये) |
| ८ | हस्तगत मालमत्ता | :- | विविध १७ बॅंकाची चेकबुक, पासबुक,एटीएम कार्ड, डेबिटकार्ड, आणि चेक, विविध कंपन्याचे ५३ मोबाईल फोन आणि विविध कंपन्याची ११५ सीमकार्ड, विविध कंपन्यांच्या नावे तयार केलेले रबरी शिक्के एकूण ४७, वेगवेगळया व्यक्तींची आधारकार्ड, पॅनकार्ड, वाहन लायसन्स. |
| ९ | अटक आरोपीतांचा तपशील | :- | १) एक पुरूष, वय ३२ वर्षे, रा.ठि. दहिसर, मुंबई.<br>२) एक पुरूष, वय २३ वर्षे, रा.ठि. कांदिवली, मुंबई.<br>३) एक पुरूष, वय १९ वर्षे, रा.ठि. कांदिवली, मुंबई.<br>४) एक पुरूष, वय २१ वर्षे, रा.ठि. कांदिवली, मुंबई.<br>५)एक पुरूष, वय ३२ वर्षे, रा.ठि. अजमेर, राजस्थान<br>६)एक पुरूष, वय २८ वर्षे, रा.ठि. भिलवाडा, राजस्थान<br>७)एक पुरूष, वय २८ वर्षे, रा.ठि. भिलवाडा, राजस्थान<br>८)एक पुरूष, वय २२ वर्षे, रा.ठि. भिलवाडा, राजस्थान<br>९)एक पुरूष, वय २८ वर्षे, रा.ठि. भिलवाडा, राजस्थान<br>१०)एक पुरूष, वय ३० वर्षे, रा.ठि. अजमेर, राजस्थान<br>११) एक पुरूष, वय २५ वर्षे, रा.ठि. अजमेर, राजस्थान<br>१२) एक पुरूष, वय २६ वर्षे, रा.ठि. भिलवाडा, राजस्थान<br>१३) एक पुरूष, वय २६ वर्षे, रा.ठि. अजमेर, राजस्थान<br>१४) एक पुरूष, वय २६ वर्षे, रा.ठि. भिलवाडा, राजस्थान<br>१५) एक पुरूष, वय ३१ वर्षे, रा.ठि. गोरेगाव, मुंबई.<br>१६)एक पुरूष, वय ३० वर्षे, रा.ठि. नालासोपारा, पालघर<br>१७)एक पुरूष, वय २३ वर्षे, रा.ठि. कल्याण, जि. ठाणे<br>१८) एक पुरूष वय ३० वर्षे तैवान चीन या देशाचा नागरिक |
| १० | तपासी अधिकारी. | :- | उत्तर विभाग सायबर पो.ठाणे, गु.अ.वि, गु.शा, मुंबई चे व.पो.नि. विजय चंदनशिवे, पोनि मंगेश देसाई, सपोनि संदीप पाचांगणे |

सदर गुन्हयातील फिर्यादी हे सेवानिवृत्त म.न.पा . अभियंता असून यातील अज्ञात सायबर गुन्हेगारांनी संगनमताने ‘व्हॉटसअप’ , ‘टेलिग्राम’ या सोशल मिडीयाच्या माध्यमातून त्यांना संपर्क करून त्यांना नामांकित कंपन्या ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, स्नॅपडिल यामध्ये ‘ऑनलाईन पार्टटाईम जॉब’ देण्याचे अमिष दाखवून व त्यांच्या माध्यमातुन उपरोक्त कंपनीत गुंतवणुक केल्यास त्याबदल्यात भरघोस परतावा मिळणार असे सांगुन फिर्यादी यांना इंडियन इन्स्टिट्युट ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (आयआयसीए) या भारत सरकारच्या शासकीय संस्थेने दिलेले आयआयसीए लोगो व राजमुद्रा असे असलेले बनावट प्रमाणपत्र व्हॉटसॲपव्दारे पाठवून फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून त्यांना कंपनीचा बिझनेस ॲप डाउनलोड करण्यास भाग पाडून त्याव्दारे विविध वस्तूंची आभासी खरेदी करण्याचे टास्क देवून फिर्यादी यांना विविध कंपन्याच्या बॅंक खात्यांचा तपशिल देवून त्यात लाखो रूपयांची भरणा करण्यास भाग पाडून अज्ञात सायबर गुन्हेगारांनी फिर्यादी यांची एकूण रू. ३४,१४,३६२/- (अक्षरी चौत्तीस लाख चौदा हजार तीनशे बासष्ट रूपये) अशी लाखो रूपयांची लुबाडणूक केली.

फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उत्तर प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा गुन्हा नोंद करण्यात आला त्यानंतर पोलीस पथकाने केलेल्या तांत्रीक विश्लेषणाव्दारे तपासामध्ये निर्दशानास असे निर्दशनास आले की, बनावट बॅंक खाते तयार करणारी टोळी भाईंदर मीरारोड परिसरात कार्यरत असल्याचे समजून आल्याने भायंदर स्टेशन परिसरातून गुन्हयातील संशयित इसमांचा शोध घेवून तसेच दादर परिसरात अश्या प्रकारे बॅंकेचे किट विकणारा इसम याचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेण्यात येवून त्यांच्या केलेल्या चौकशीत त्यांच्या सदर गुन्हयातील सहभाग निश्चित झाल्याने त्यांना अटक करण्यात आली. तसेच सदर गुन्हयात अश्या प्रकारचे खोटया माहितीच्या आधारे कंपन्याच्या नावे बॅंक खाती काढण्यास मदत करणारे बॅंक कर्मचारी यांना देखील सदर गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. सदरवेळी त्यांच्याकडून विविध खातेदारांच्या नावावर असलेली विविध बॅंकांची पासबुक, चेकबुक, एटीएम कार्ड, डेबिट कार्ड,चेक, विविध कंपन्याचे १०० पेक्षा अधिक सीमकार्ड, ५० पेक्षा अधिक मोबाईल, विविध कंपन्याच्या नावाचे ४७ रबरी शिक्के, तसेच वाहन लायसन्स, आधारकार्ड, पॅनकार्डच्या छायांकित प्रती असा गुन्हयात वापर करण्यात आलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात तपासी पथकास यश मिळालेले आहे. नमुद सायबर गुन्हा हा अत्यंत क्लिष्ट व गुंतागुंतीचा असून तपासी पथकाची जलदगतीने, सातत्यपुर्ण, चिकाटीने, जिज्ञासापूर्वक तपास करण्याची कामगिरी दिसून येत आहे.

सदरचा गुन्हा गंभीर स्वरूपाचा सायबर गुन्हा असून सायबर गुन्हेगारांनी नामांकित कंपन्यांचे लोगो वापरुन, शासकिय चिन्हे असलेले प्रमाणपत्रांचा वापर करून समाजातील जेष्ठ नागरीक, सेवानिवृत्त यांना सोशल मिडीयाव्दारे संपर्क करुन त्यांचा विश्वास संपादन करून त्यांना घरबसल्या ‘ऑनलाईन पार्टटाईम जॉब’ व त्याव्दारे भरघोस परतावा असे अमिष दाखवून त्यांची लाखो रूपयांची फसवणुक केलेली असून देशभरात अश्या प्रकारचे सायबर गुन्हे या टोळीने केल्याची दाट शक्यता आहे. सदरचा गुन्हा उघडकीस आणून तपासी पथकाने सर्वसामान्य जनता, जेष्ठ नागरिक, सेवानिवृत्त कर्मचारी यांचे आर्थिक नुकसान होण्यापासून बचाव केलेला असून जनतेचा पोलीसांवरील विश्वास अधिक दृढ केलेला आहे.

उत्तर प्रादेशिक विभाग सायबर पोलीस ठाणे, मुंबई यांच्याकडून जनतेस आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारची फसवणुक झाल्यास *www.cybercrime.gov.in* या पोर्टलवर जावुन तक्रार नोंदवावी अथवा १९३० या क्रमांकावर संपर्क साधुन त्यांच्यासोबत झालेल्या फसवणुकबाबतची माहीती तात्काळ द्यावी किंवा संबंधित कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधी अथवा कार्यालयाशी संपर्क साधावा. सोशल मिडियावर प्रसारित होणाऱ्या कोणत्याही संदेशाबाबत जागरूकतेने व खात्रीकरुन प्रतिसाद द्यावा. आपली अशाप्रकारे फसवणुक झाली असल्यास किंवा आपणांस अशा प्रकारची माहिती प्राप्त झाल्यास त्याची माहिती तात्काळ स्थानिक पोलीस ठाणे अथवा सायबर पोलीस ठाणे मुंबई यांना द्यावी.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. श्री विवेक फणसळकर (भा.पो.से.), पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री सुहास वारके(भा.पो.से.), पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मा. डॉ. बाळसिंग राजपूत, पोलीस उप आयुक्त (सायबर गुन्हे), श्री. रामचंद्र लोटलीकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, व.पो.नि. विजय चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि मंगेश देसाई, स. पो.नि. संजय पवार, सपोन संदीप पाचांगणे, मपोह ००१२/प्राची मुळीक, पो.ह. ०१०४५४/पावस्कर, पोना ९८०७३४/आयरे, पो.ना. ०३११८२/शिंदे, पो.शि. ०९०३७१ सय्यद कादरी, पो.शि. १३०२७५/बोरसे, पो.शि. ११०६६५/सुर्यवंशी, पो.शि. ११०१३४/मेघे, म.पो.ना.०६०६३१/दळवी, म.पो.ना. ०६१०९८/पाटील, म.पो.शि. ०४१२१२/नगरकर, म.पो.शि. ०७१४५५/शिंदे यांनी पार पाडली आहे.

-----000-----